**प्रेस नोट ता. ३०/०६/२०२३**

# तोतया क्राईम ब्रँच पोलीस अधिकारी जेरबंद

# बतावणीचे गुन्हे करणारा रेकॉर्डवरील सराईत तडीपार इराणी गुन्हेगार

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

**चाकण पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४८८/२०२३ भादवि का क ४२०, ४०६, ४१७, १७० प्रमाणे**

**भोसरी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ४६९/२०२३ भादवि कलम ४२०, ३४ प्रमाणे**

दिनांक २७/०५/२०२३ रोजी मोलमजुरीची कामे करणारे इसम नामे आण्णा नाना पवार,वय ५२ वर्षे सध्या रा. हिंजवडी हे रेशन व सिलेंडर टाकी घेणेसाठी त्यांचे दुचाकीवरुन नारायणगाव येथे जात असतांना पुणे - नाशिक रोडवर चाकण येथे अचानक पाठीमागुन स्पोर्ट बाईकवरुन आलेल्या उंच-धिपाड इसमाने धमकावले व दोन-तीन वेळा हाका मारुन सुध्दा थांबला नाहीस असे म्हणुन गाडी साईडला घेण्यास सांगितली. आण्णा पवार यांनी घाबरुन गाडी साईडला घेतली असता क्राईम ब्रँच पोलीस अधिकारी असल्याचे कार्ड दाखवुन गांजाची चेकींग चालू आहे असे सांगुन त्यांची अंगझडती घेतली. खिशातील मोबाईल, पैसे, डायरी, गळयातील चैन असे गाडीचे डीकीत ठेवण्याचा बहाणा करुन हातचलाखीने ३६.६५० ग्रॅम वजनाची सोन्याची चैन चोरुन नेली.

दिनांक ३/६/२०२३ रोजी भोसरी येथील पुलाखाली वृध्द महीला नामे कलावती बबनराव कांबळे वय ६२ वर्षे रा.विश्रांतवाडी पुणे या नातीला उसाचा रस पाजुन घरी जाणेसाठी निघाल्या असतांना एका इसमाने त्यांचेजवळ येवून ३० तोळयाचे सोन्याचे गठुडे पडले आहे तुम्हाला सापडले का असे विचारले पुन्हा दुस-या इसमाने येवून तिस-या इसमाकडे बोट दाखवुन त्याला सोन्याचे गठुडे मिळाले आहे त्याला २ – २ लाख रुपये देवू व सोने वाटून घेवू अशा भुलथापा मारुन वृध्द महीलेने पैसे नसल्याचे सांगितलेने तिचे गळयातील दीड तोळे वजनाचे सोन्याचे गंठन देण्यास सांगुन बनावट सोन्याचा तुकडा देवून फसवणुक करुन पसार झाले.

वारंवार पोलीस बतावणीचे गुन्हे घडल्याने मा. पोलीस आयुक्त सो. यांनी विशेष मोहीम राबवुन गुन्हे उघडकीस आणणेबाबत गुन्हे शाखेना आदेशीत केले होते. नमुद गुन्हयांचा गुन्हे शाखा युनिट २ कडून समांतर तपास सुरु असतांना चाकण व भोसरी परिसरातील सीसीटीव्ही कॅमे-यांची सातत्याने तपासणी करुन सदरचा गुन्हे इराणी गुन्हेगारांनी केल्याचे निष्पन्न केले. इराणी गुन्हेगारांच्या गुन्हा करण्याच्या पध्दतीचे परिपुर्ण ज्ञान व ठाव ठिकाणांची माहीती असलेले माहीतगार सहा.पोलीस फौजदार शिवानंद स्वामी यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, पुणे पोलीस आयुक्तालयाचे रेकॉर्डवरील तडीपार गुन्हेगार आबालु जाफर इराणी रा. इराणीवस्ती शिवाजीनगर पुणे याने त्याचे इतर साथीदारांचे मदतीने सदरचे गुन्हे केले आहेत.

काल दिनांक २९/०६/२०२३ रोजी आबालु इराणी हा निगडी परिसरात आला असल्याची माहीती मिळालेने पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक गणेश माने व गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार यांच्या पथकाने सापळा लावुन आबालु इराणी यास शिताफीने ताब्यात घेतले. आरोपी आबालु इराणी याचेकडे क्राईम ब्रँच पोलीस अधिकारी असल्याची एकूण ४ बनावट ओळखपत्रे मिळुन आली. त्या अनुषंगाने त्याचेकडे कसुन चौकशी करुन चाकण व भोसरी पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयांमध्ये फसवणुक करुन चोरलेले ५ तोळे वजनाचे सोन्याचे दागीने व गुन्हा करणेसाठी वापरत असलेली महागडी स्पोर्ट बाईक असा एकूण सुमारे ४ लाख रुपये किंमतीचा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपी हा बतावणी करुन फसवणुक करणारा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असुन त्याने पुणे, सातारा, नाशिक, ठाणे

जिल्हा, भाईंदर, खंडाळा, भोईसर या ठिकाणी एकूण २० गुन्हे केलेले आहेत. आरोपीत याचेकडे गुन्हयांबाबत सखोल तपास करुन तपासावरील गुन्हयाचेकामी चाकण पोलीस स्टेशनला हजर केले आहे.

पोलीस दलाचेवतीने नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, पोलीस असल्याची बतावणी करुन सोन्या-चांदीचे दागीने , रोख रक्कमेची फसवणुक करुन चोरी केली अशी घटना घडल्यास तात्काळ स्थानिक पोलीस स्टेशन अथवा नियंत्रण कक्षाशी तात्काळ संपर्क साधुन माहीती द्यावी.

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्रीमती स्वप्ना गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री सतिश माने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक श्री गणेश माने, गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस अंमलदार शिवानंद स्वामी, केराप्पा माने, उषा दळे, देवा राऊत, विपुल जाधव, आतिष कुडके, नामदेव कापसे, अजित सानप, शिवाजी मुंढे, उध्दव खेडकर, संदेश देशमुख यांनी केली आहे.**

(स्वप्ना गोरे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड